# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) कार्यशाळा संपन्न

- दिनांक : दि. १८/०१/२०२४ सकाळी ११.३० वा.
- स्थळ : सेमिनार हॉल
- अध्यक्ष : प्राचार्य डॉ. अनिल जे. पाटील
- प्रमुख वक्ते : मा. प्रा. डॉ. आर एल शिंदे विभागप्रमुख, सांख्यिकी विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव
- उपस्थित विद्यार्थी : १२ वी वर्गातील ५४ विद्यार्थी, पदवी वर्गातील ४६ विद्यार्थी,
- इतर उपस्थिती : उपप्राचार्य प्रा. डॉ. अरविंद बडगुजर, ४३ शिक्षक व सुमारे १० पालक
- सूत्र संचलन : प्रा. एन. बी. गायकवाड

दिनांक 18 जानेवारी 2024 रोजी यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे दादासाहेब दिगंबर शंकर पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एरंडोल यांच्या सेमिनार हॉलमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत थीम अँड प्रॉस्पेक्ट साठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत मा. प्रा. डॉ. आर एल शिंदे विभागप्रमुख, सांख्यिकी विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याबाबत सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी हा अध्ययनार्थी असताना तो स्वावलंबी कसा होईल? या स्वावलंबनासाठी त्यास कोणकोणत्या कौशल्यांची आवश्यकता आहे? याचे विस्तृत विवेचन मान्यवर मार्गदर्शकाने केले. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी हा केवळ फक्त त्याच्या संबंधित विषयांशी संबंधित न राहता विविध विषयांचे त्याला ज्ञान व विद्याशाखांचे निवड करून घेता येईल. भावी आयुष्यात उपयोजित शिक्षणाचा त्याला कसा लाभ करून घेता येईल? औपचारिक व अनौपचारिक विषयांचे ज्ञान कसे अवगत होईल? व त्याच्या सर्वांगीण विकासासाठी ते कसे पूरक ठरेल? याबाबत प्रमुख मार्गदर्शक यांनी सखोल ऊहापोह केला. त्याचबरोबर प्रचलित शैक्षणिक धोरणापेक्षा नवीन प्रस्तावित शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक करिअरमध्ये प्रमुख व पूरक विषयाची निवड विविध ज्ञान शाखांमधील विषयांचा अंतर्भाव औद्योगिक व व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण प्रकल्प संशोधन इत्यादींचा समावेश करून त्याला पदवी कसे प्राप्त करून घेता येईल? व पुढील उच्च शिक्षणासाठी तसेच संशोधन क्षेत्रातील पदवी कशी प्राप्त करता? येईल याचे सखोल मार्गदर्शन मार्गदर्शकांनी केले

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त करताना त्यांना आर्थिक व इतर सदर पदवी प्राप्त करताना सदर पदवी प्राप्त करताना सद्यस्थितीत दिलेल्या अडचणी आल्यास त्यांना सदर कोर्समध्ये अवकाश घेऊन इतर

महाविद्यालयात किंवा इतर विद्यापीठात सात वर्षाच्या आत पदवी प्राप्त करता येऊ शकते. सदर पदवी प्राप्त करताना सद्यस्थितीत प्राप्त परीक्षेचे गुण इतर ठिकाणी हस्तांतरित होऊन विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त करून घेता येईल. मार्गदर्शकांनी ABC ID व इतर बाबींबद्दल सखोल माहिती देऊन विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष मा. अमितदादा पाटील यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल जे. पाटील होते. सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अरविंद बडगुजर, १२ वी वर्गातील ५२ विद्यार्थी, पदवी वर्गातील ३५ विद्यार्थी, २५ शिक्षक व सुमारे १० पालक उपस्थित होते.  कार्यशाळेचे सुत्रसंचलन कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. एन. बी. गायकवाड यांनी केले.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) कार्यशाळा – निवडक छायाचित्रे




मा. प्रा. डॉ. आर एल शिंदे विभागप्रमुख, सांख्यिकी विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याबाबत सखोल व सविस्तर मार्गदर्शन करताना



उपस्थित मा. प्राचार्य, उपप्राचार्य, कनिष्ठ व वरिष्ठ महाविदायालायचे विद्यार्थी, शिक्षक व पालक



उपस्थित कनिष्ठ व वरिष्ठ महाविदायालायचे विद्यार्थी, शिक्षक व पालक



उपस्थित कनिष्ठ व वरिष्ठ महाविदायालायचे विद्यार्थी, शिक्षक व पालक


Yashwantrao Chavan Shikshan Prasarak Mandal's
DADASAHEB DIGAMBAR SHANKAR PATIL
ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE
ERANDOL, DIST . JALGAON
Organises
One day Seminar for
12 th Standard Student , UG Final Year Students, Teachers and Parents
" National Education Policy 2020: Theme and Prospects"
Resource Person:- Prof.R. L. Shinde
Supported by
IQAC, Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
Day & Date:- Thursday, 18/01/2024
Venue:- YCSP Mandal's DDSP College, Erandol
A Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

कार्यशाळेचे पोस्टर




कार्यशाळेचे Flyer